**ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाच्यासमक्ष**
**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम**

(विद्युत अधिनियम,२००३ मधील कलम ४२ च्या उपकलम ५ नुसार प्रस्थापित केलेल्या)

तळ मजला, बहुमजली विस्तारीत इमारत,
बेस्ट कुलाबा आगार,
कुलाबा, मुंबई- ४०० ००१

दुरध्वनी क्र.२२८५३५६१

**प्रतिनिधीत्व क्रमांक ग्रा.गा.नि.म./१५६/२००९ दि. २०.०४.२००९**
**अर्ज दाखल करण्यापुर्वीची सुनावणी**

श्री. विश्वनाथ काशीनाथ गुंड …………….. फिर्यादी

विरूध्द

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परीवहन उपक्रम …………………. उत्तरवादी

**उपस्थित**

| | | | |
|---|---|---|---|
| गणपूर्ती | : | १. | श्री.सु.प्या.गोस्वामी, हगांमी अध्यक्ष |
| | : | २. | सौ. वनमाला मंजुरे, सदस्या |
| फिर्यादीच्या वतीने | : | १. | श्री .विश्वनाथ काशीनाथ गुंड |
| उत्तरवादीच्या वतीने | : | १. | श्री. व्ही.एन.तांबे, अधिक्षक (ग्राहक सेवा, इ विभाग) |
| | | २. | श्री.एस. आर. कन्सारा,का.अ.(ग्राहक सेवा, इ विभाग) |
| | | ३. | श्रीमती. ई.एफ. जाकीस, कार्यालय सहायक |
| सुनावणी दिनांक | : | १३.०५.२००९ | |

**हंगामी अध्यक्ष श्री.सु.प्या.गोस्वामी, यांनी दिलेला निर्णय**

श्री. विश्वनाथ काशीनाथ गुंड, राहणार १८०, श्रॉफ बिल्डींग, डॉ. मस्करेहान्स रोड, माझंगाव, मुंबई - ४०० ०१०. हे वीज देयक क्र, ५१५-०८०-००९ वरील नांव बदली करणेबाबतचे गाऱ्हाणे मंचाकडे घेऊन आले.

**घटनेचा संक्षिप्त इतिहास:**

१. विजदेयक क्र, ५१५-०८०-००९, श्री. विश्वनाथ काशीनाथ गुंड, राहणार १८०, श्रॉफ बिल्डींग, डॉ. मस्करेहान्स रोड, माझंगाव, मुंबई - ४०० ०१०. या गाऱ्हाणे धारकाच्या नावावर मे २००४ पासून ऑगस्ट २००८ पर्यंत होते. ऑगस्ट २००८ पासून सदर वीजदेयक श्रीमती विठाबाई काशीनाथ गुंड (गाऱ्हाणे धारकाची आई) यांच्या नावावर करण्यात आले.

२. वीजदेयक क्र. ५१५-०८०-००९ हे श्री. काशीनाथ एम्.गुंड यांच्या नांवे होते. श्री. काशीनाथ एम्. गुंड यांचे निधन दि. २५.०७.१९७२ रोजी झाले. तद्नंतर त्यांचा मुलगा श्री विश्वनाथ काशीनाथ गुंड याने दि. १६.१२.२००३ रोजी सदर वीजदेयक स्वत:च्या नांवे करण्यासाठी बेस्टकडे अर्ज केला होता. त्या अर्जासोबत श्री.विश्वनाथ काशीनाथ गुंड यांनी शिधावाटप पत्राची प्रत, भरणा केलेल्या वीजदेयकाची प्रत, त्यांचे वडील कै.काशीनाथ एम्. गुंड यांच्या मृत्यूचा दाखल्याची प्रत जोडलेली होती. तसेच श्री. विश्वनाथ काशीनाथ गुंड यांनी अर्जासोबत रू.२० च्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र सादर केले होते. त्या शपथपत्रामध्ये त्यांनी असे नमुद केले होते की, वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांची आई श्रीमती विठाबाई का.गुंड ही त्यांच्या सोबत रहाते.

३. गाऱ्हाणे धारकाने अर्जासोबत बेस्टकडे कोणत्याही कायदेशीर वारसाचे संमतीपत्र सादर केले नव्हते. परंतु अर्जात नमुद केल्याप्रमाणे जर श्री. विश्वनाथ काशीनाथ गुंड यांच्या नांवे वीजमापक झाल्यानंतर कोणत्याही व्यक्तीने आक्षेप घेतला असता वीजदेयकावरील नांव पुनश्च: बदली करण्याचे अधिकार तक्रारदाराने बेस्टला हमीपत्राद्वारे दिले होते. श्री. विश्वनाथ काशीनाथ गुंड यांच्याकडून प्राप्त झालेल्या कागदपत्रे व हमीपत्रानुसार सदर वीजदेयक दि. १६.१२.२००३ पासून त्यांच्या नांवावर करण्यात आले होते.

४. कै. काशीनाथ एम्.गुंड यांच्या पत्नी श्रीमती विठाबाई काशीनाथ गुंड यांनी दि. २७.०२.२००८ च्या पत्राद्वारे वरील वीजदेयकावरील नांव बदली संदर्भात आक्षेप घेतला. त्यांना या पत्राद्वारे सदर वीजदेयक त्यांच्या नांवावर करण्याची विनंती केली.

५. श्री. विश्वनाथ गुंड यांना बेस्टने कळविले की, वीजदेयकांवरील नाव स्वत:च्या नांवे बदली करून घेताना जी कागदपत्रे सादर केली होती त्याच्या मूळ प्रती बेस्टच्या कार्यालयात १५ दिवसांत सादर करण्यास सांगितले. त्यांनी तसे न केल्यास याबाबतची योग्य कार्यवाही केली जाईल असेही श्री. विश्वनाथ गुंड यांना सांगण्यात आले होते. परंतु श्री. विश्वनाथ गुंड, यांनी सदर कागदपत्रे बेस्टच्या कार्यालयात सादर केली नाहीत.

६. तद्नंतर वीजदेयक क्र.५१५-०८०-००९ वरील वीजदेयकाचे नांव बदलीबाबत वाद निर्माण झाल्यामुळे बेस्टला श्री. विश्वनाथ काशीनाथ गुंड यांच्याकडून घेतलेल्या हमीपत्रानुसार मूळ वीजग्राहक श्री. काशीनाथ एम्. गुंड यांच्या नांवे करणे गरजेचे होते. परंतु श्री. काशीनाथ गुंड हे निधन पावले असल्यामुळे वीजदेयक त्यांच्या नांवावर करता येणे शक्य नव्हते. यास्तव त्यांच्या प्रथम वारसदार त्यांची पत्नी श्रीमती विठाबाई का. गुंड यांच्याकडून नांव बदली करण्यासाठी अर्ज प्राप्त झाल्यामुळे सदर देयक त्यांच्या नांवावर दि.१७.०६.२००८ पासून करण्यात आले. त्याचबरोबर श्री. विश्वनाथ काशीनाथ गुंड यांना बेस्टने पत्राद्वारे असे कळविले की, त्यानी वीजदेयक त्यांच्या नांवावर करण्याकरिता त्यांची आई श्रीमती विठाबाई गुंड व इतर कायदेशीर वारसांचे संमतीपत्र सादर केल्यास बेस्ट उपक्रमाचे वीजदेयक क्र. ५१५-०८०-००९ हे त्यांच्या स्वत:च्या नांवावर करण्यांत येईल.

७. ग्राहाणे धारकाने सदर वीजदेयकावरील नावे बदली करणे बाबत ०८.१२.२००८ रोजी प्रपत्र ‘क’ अन्वये अंतर्गत ग्राहाणे यंत्राणा कक्षाकडे अर्ज सादर केला.

८. यासंबंधी अंतर्गत ग्राहाणे यंत्राणा कक्षाने दि.०३.०२.२००९ ला दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने ग्राहाणे धारकाने अनुसूची ‘अ’ च्या नमुन्यात मंचाला ग्राहाणे सादर केले.

**ग्राहकाने आपल्या अर्जामध्ये आणि सुनावणीच्या वेळी खालीलप्रमाणे निवेदन केले:**

१. विजदेयक क्र, ५१५-०८०-००९, श्री. विश्वनाथ काशीनाथ गुंड, राहणार १८०, श्रॉफ बिल्डींग, डॉ. मस्करेहान्स रोड, माझंगाव, मुंबई - ४०० ०१०. या ग्राहाणे धारकांच्या नावावर मे २००४ पासून ऑगस्ट २००८ पर्यत होते.

२. ग्राहाणेधारकाच्या वडिलांच्या मृत्यूनंतर आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर सदर वीजदेयकांवरील नावात बदल करण्यात आला.

३. ऑगस्ट २००८ पासून सदर वीजदेयक श्रीमती विठाबाई का.गुंड (ग्राहाणे धारकाची आई) यांच्या नावावर करण्यात आले.

४. ग्राहाणे धारकानुसार श्रीमती. विठाबाई का. गुंड ह्या आता सदर ठिकाणी राहत नाहीत. तसेच त्याच्या नांवावर भाडेपावती व रेशन कार्ड नाही.

५. ग्राहाणे धारकाने सदर वीजदेयकावरील नांवात बदल करण्याबाबत ०८.१२.२००८ रोजी प्रपत्र ‘क’ अन्वये अंतर्गत ग्राहाणे यंत्राणा कक्षाकडे अर्ज सादर केला.

६. यासंबंधी अंतर्गत ग्राहाणे यंत्रणा कक्षाने दि.०३.०२.२००९ ला दिलेल्या उत्तराने असमाधान झाल्याने ग्राहाणे धारकाने अनुसूची ‘अ’ च्या नमुन्यात मंचाला ग्राहाणे सादर केले.

७. अर्ज दाखल करून घेतल्यानंतर सुनावणीच्यावेळी श्री.विश्वनाथ गुंड यांने सदर वीजदेयक हे आता श्रीमती विठाबाई गुंड याच्या नावे येत असल्याचे सांगितले परंतु श्रीमती विठाबाई गुंड हया येथे राहत नसल्याने सदर जागेत एखादा विद्युत अपघात झाल्यास त्यास जबाबदार कोण? असा प्रश्न उपस्थित केला.

**बेस्टने लिखित स्वरूपात आणि सुनावणीच्या वेळी खालीलप्रमाणे निवेदन केले:**

**वीजदेयक नांव बदली वाद प्रकरण.**

वीजदेयक क्र. ५१५-०८०-००९ हे श्री. काशीनाथ एम्.गुंड यांच्या नांवे होते. श्री. काशीनाथ एम्. गुंड यांचे निधन दि. २५.०७.१९७२ रोजी झाले. तद्नंतर त्यांचा मुलगा श्री विश्वनाथ काशीनाथ गुंड याने दि. १६.१२.२००३ रोजी सदर वीजदेयक स्वत:च्या नांवे करण्यासाठी अर्ज केला होता. त्या अर्जासोबत श्री. विश्वनाथ काशीनाथ गुंड यांनी शिधावाटप पत्राची प्रत, भरणा केलेल्या वीजदेयकाची प्रत, त्यांचे वडील कै.काशीनाथ एम्. गुंड यांच्या मृत्यूचा दाखल्याची प्रत जोडलेली होती. तसेच श्री. विश्वनाथ काशीनाथ गुंड यांनी अर्जासोबत रू.२० च्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र सादर केले होते. त्या शपथपत्रामध्ये त्यांनी असे नमुद केले होते की, वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांची

आई श्रीमती विठाबाई का.गुंड ही त्यांच्या सोबत रहाते. तसेच स्वत: सरकारी नोकरीत कामाला असल्याकारणाने त्यावेळी त्यांची बदली पूणे शहरात झाली होती. म्हणून पूर्वी त्यांना नांव बदलीचा अर्ज व शपथपत्र देता आले नव्हते. अर्जासोबत कोणत्याही कायदेशीर वारसाचे संमतीपत्र सादर केले नव्हते. परंतु अर्जात नमुद केल्याप्रमाणे जर श्री. विश्वनाथ काशीनाथ गुंड यांच्या नांवे वीजमापक झाल्यानंतर कोणत्याही व्यक्तीने आक्षेप घेतला असता वीजदेयकावरील नांव पुनश्च: बदली करण्याचे अधिकार हमीपत्राद्वारे दिले होते. श्री. विश्वनाथ काशीनाथ गुंड यांच्याकडून प्राप्त झालेल्या कागदपत्रे व हमीपत्रानुसार सदर वीजदेयक दि. १६.१२.२००३ पासून त्यांच्या नांवावर करण्यात आले होते.

तद्नंतर कै. काशीनाथ एम्.गुंड यांच्या पत्नी श्रीमती विठाबाई काशीनाथ गुंड यांनी दि. २७.०२.२००८ च्या पत्राद्वारे वरील वीजदेयकावरील नांव बदली संदर्भात आक्षेप घेतला. त्यांनी त्यांच्या या पत्रामध्ये असे नमुद केले की, माझ्या पतीच्या मृत्यूनंतर मी सतत २५ वर्षपेक्षा जास्त दिवस वीज वापरत आहे व वीजदेयकाचा भरणा करीत आहे. तरीसुध्दा वीजदेयक माझ्या नांवावर करण्यांत आले नाही. त्यांना या पत्राद्वारे सदर वीजदेयक त्यांच्या नांवावर करण्याची विनंती केली.

श्रीमती विठाबाई गुंड यांच्याकडून प्राप्त झालेले नांव बदली करणेबाबतचा वाद निर्माण करणारे पत्र आमच्या कार्यालयात प्राप्त झाल्यानंतर आम्ही पत्र क्र. CC(N/E)/Adm-43/(E)9946/2008, दि. २१.०४.२००८ श्री. विश्वनाथ गुंड यांना नांव बदली करण्याबाबत हरकत घेण्याच्या आपल्या पत्रासंबंधीची माहिती दिली आणि त्यांना विद्युत देयक क्र. ५१५-०८०-००९ स्वत:च्या नांवे बदली करून घेताना जी कागदपत्रे आमच्या कार्यालयात सादर केली होती त्याच्या मूळ प्रती आमच्या कार्यालयात १५ दिवसांत सादर करण्यास सांगितले. त्यांनी तसे न केल्यास याबाबतची योग्य कार्यवाही केली जाईल असेही श्री. विश्वनाथ गुंड यांना सांगण्यात आले होते. परंतु श्री. विश्वनाथ गुंड, यांनी सदर कागदपत्रे आमच्या कार्यालयात सादर केली नाहीत.

तद्नंतर वीजदेयक क्र.५१५-०८०-००९ वरील वीजदेयकाचे नांव बदलीबाबत वाद निर्माण झाल्यामुळे श्री. विश्वनाथ काशीनाथ गुंड यांच्याकडून घेतलेल्या हमीपत्रानुसार मूळ वीजग्राहक श्री. काशीनाथ एम्. गुंड यांच्या नांवे करणे गरजेचे होते. परंतु श्री. काशीनाथ गुंड हे निधन पावले असल्यामुळे वीजदेयक त्यांच्या नांवावर करता येणे शक्य नव्हते. यास्तव त्यांच्या प्रथम वारसदार त्यांची पत्नी श्रीमती विठाबाई का. गुंड यांच्याकडून नवीन नांव बदली करण्यासाठी अर्ज प्राप्त झाल्यामुळे सदर देयक त्यांच्या नांवावर दि.१७.०६.२००८ पासून करण्यात आला. नवीन अर्जासोबत श्रीमती विठाबाई का. गुंड यांनी त्यांच्या जुन्या शिधावाटप पत्राची प्रत जोडलेली आहे, ज्यामध्ये त्यांच्या सर्व कुटुंबीयांची नांवे नमुद केली आहेत. तसेच त्यासोबत पतीच्या मृत्यूच्या दाखला व सन १९९६ मधील वीजदेयकाची प्रत जोडली होती.

श्री. विश्वनाथ काशीनाथ गुंड यांनी दि. २६.०८.२००८ च्या पत्राद्वारे वीजदेयक क्र. ५१५-०८०-००९ वरील बदली झालेल्या नांवावरती आक्षेप घेवून ते वीजदेयक पुनश्च: आपल्या नांवावर करावे असे सूचित केले आहे. या पत्रासोबत त्यांनी वडीलांच्या मृत्यूच्या दाखल्याची प्रत व दि. २७.०४.२००४ पासून स्वत:च्या नांवावर असलेल्या शिधावाटप पत्राची प्रत तसेच स्वत:च्या व त्यांचा भाऊ चंद्रकांत का. गुंड यांच्या नांवावर असलेली मे २००८ ची भाडेपावती च सुशांत विश्वनाथ गुंड यांच्या नांवावर असलेले दुरध्वनी देयक व त्यांनी नांव बदली करतेवेळी भरणा केलेल्या अनामत रक्कम रू. २५०/- च्या पावतीची प्रत जोडलेली होती.

श्री. विश्वनाथ काशीनाथ गुंड यांनी दि. ०८.१२.२००८ रोजी प्रपत्र ‘क’ मध्ये तक्रार नोंदविली व त्यासोबत सदर जागेतील वास्तव्याचा पुरावा जोडला श्री. विश्वनाथ काशिनाथ गुंड यांनी प्रपत्र ‘क’ सोबत जोडलेली माहे २००८ ची भाडेपावती दोन भावांच्या म्हणचेच श्री. विश्वनाथ का. गुंड व श्री. चंद्रकांत का.गुंड यांच्या नांवे आहे.

दि. ०३.०२.२००९ रोजी श्री. विश्वनाथ का. गुंड यांना प्रपत्र क्र. ग्रा.से.(ई)/प्रशा-४३/२९४०/२००९ च्या अनुषंगाने असे कळविण्यांत आले की, श्रीमती. विठाबाई का. गुंड यांनी दि. २७.०४.२००८ च्या पत्राद्वारे वीजदेयक क्र. ५१५-०८०-००९ यावरील नांव बदलीबाबत आक्षेप घेतला असल्याने व श्री. विश्वनाथ का. गुंड यांनी दिलेल्या हमीपत्रानुसार सदर वीजदेयकावरील नांव पूर्ववत करण्याचे गरजेचे होते. परंतु पूर्वीचे वीजग्राहक कै. काशीनाथ एम्. गुंड हे मृत्यू पावले असल्याकारणाने सदर वीजदेयक त्यांची पत्नी व प्रथम वारसदार श्रीमती विठाबाई का. गुंड यांच्या नांवावर करण्यांत आले . त्याचबरोबर श्री काशीनाथ गुंड यांना या पत्राद्वारे असे कळविण्यांत आले की, त्यानी वीजदेयक त्यांच्या नांवावर करण्याकरिता त्यांची आई श्रीमती विठाबाई गुंड व इतर कायदेशीर वारसांची संमतीपत्र सादर केल्यास बेस्ट उपक्रमाचे वीजदेयक क्र. ५१५-०८०-००९ हे त्यांच्या स्वत:च्या नांवावर करण्यांत येईल.

**तक्रारीचा तपशील :**

**या तक्रारीबाबतचा मुद्देनिहाय खुलासा खालीलप्रमाणे:**

एखाद्या वीजग्राहकाच्या मृत्यूनंतर त्या वीजग्राहकाच्या वीजदेयकावरील नांव बदली करण्याकरिता अर्जासोबत मृत्यूचा दाखला व इतर कायदेशीर वारस यांचे संमतीपत्र व त्याचबरोबर आवश्यक ते वास्तव्याचे पुरावे देणे जरूरीचे आहे. या वादग्रस्त प्रकरणात तक्रारदाराने स्वत:च्या वडीलांच्या मृत्यूनंतर तब्बल ३१ वर्षाने (नोंदणीकृत वीजग्राहकाचा मृत्य दि. २३.०७.१९७२) बेस्ट उपक्रमाकडे वीजदेयक क्र. ५१५-०८०-००९ वरील नांव बदली करण्यासाठी अर्ज केला होता. सदर अर्जासोबत त्यांनी नांवात बदल करण्यासाठी इतर वारसदारांचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक होते. परंतु हे प्रमाणपत्र त्यांनी न दिल्यामुळे त्यांच्याकडून वीजदेयकाच्या नांव बदलासंदर्भात वाद उद्भवल्यास, सदर वीजदेयकावरील नांव पुर्ववत करण्यासाठी हमीपत्र घेण्यात आले होते.

तक्रारदाराने आपल्या दि. ०८.०४.२००९ च्या पत्राद्वारे असे कळविले की, शिधावाटप पत्र व भाडेपावती आईच्या नांवे नसताना तसेच ती त्या जागेत वास्तव्य करीत नसताना सुध्दा, वीजदेयक क्र. ५१५-०८०-००९ आईच्या म्हणजेच श्रीमती विठाबाई का. गुंड यांच्या नांवे करण्यात आले.

श्री. विश्वनाथ काशीनाथ गुंड याने दि. १५.१२.२००३ रोजी सदर वीजदेयक स्वत:च्या नांवे करण्यासाठी अर्ज केला होता. त्या अर्जासोबत श्री. विश्वनाथ काशीनाथ गुंड यांनी शिधावाटप पत्राची प्रत, भरणा केलेल्या वीजदेयकाची प्रत, त्यांचे वडील कै. काशीनाथ एम्. गुंड यांच्या मृत्यूचा दाखल्याची प्रत जोडलेली होती. तसेच श्री. विश्वनाथ काशीनाथ गुंड यांनी अर्जासोबत रू.२० च्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र सादर केले होते. सदर हमीपत्रात त्यांनी असे नमुद केले होते की, जर श्री. विश्वनाथ काशीनाथ गुंड यांच्या नांवे वीजमापक झाल्यानंतर कोणत्याही वारसदाराने आक्षेप घेतल्यास वीजदेयकावरील नांव पुनश्च: बदली करण्याचा अधिकार बेस्ट उपक्रमाकडे राहील.

तद्नंतर कै. काशीनाथ एम्. गुंड पत्नी श्रीमती विठाबाई काशीनाथ गुंड यांनी दि. २७.०२.२००८ च्या पत्राद्वारे वरील वीजदेयकावरील नांव बदली संदर्भात आक्षेप घेतला होता. त्यांनी त्यांच्या या पत्रामध्ये असे नमुद केले की, माझ्या पतीच्या मृत्यूनंतर मी सतत २५ वर्षापेक्षा जास्त दिवस वीज वापरत आहे. व वीजदेयकाचा भरणा करीत आहे. तसेच या पत्राद्वारे त्यांनी सदर वीजदेयक त्यांच्या नांवे करण्याची विनंती केली.

श्रीमती विठाबाई गुंड यांच्याकडून प्राप्त झालेले नांव बदली करणेबाबचा वाद निर्माण करणारे पत्र आमच्या कार्यालयात प्राप्त झाल्यानंतर आम्ही पत्र क्र. CC(N/E)/Adm-43/(E)9946/2008, दि. २१.०४.२००८

श्री.विश्वनाथ गुंड यांना नांव बदली करण्याबाबत हरकत घेणाऱ्या आपल्या पत्रासंबंधीची माहिती दिली आणि त्यांना विद्युत देयक क्र. ५१५-०८०-००९ स्वत:च्या नांवे बदली करून घेताना जी कागदपत्रे आमच्या कार्यालयात सादर केली होती त्याच्या मूळ प्रती आमच्या कार्यालयात १५ दिवसांत सादर करण्यास सांगितले. त्यांनी तसे न केल्यास याबाबतची योग्य कार्यवाही केली जाईल असेही श्री. विश्वनाथ गुंड यांना सांगण्यात आले होते. परंतु श्री. विश्वनाथ गुंड यांनी सदर कागदपत्रे आमच्या कार्यालयाात सादर केली नाहीत.

यास्तव वीजदेयक क्र. ५१५-०८०-००९ वरील नांव बदली करण्यासंबंधी वाद निर्माण झाल्यामुळे श्री. विश्वनाथ काशीनाथ गुंड याच्याकडून घेतलेल्या हमीपत्रानुसार सदर वीजदेयक पुनश्च:च कै. काशीनाथ एम.गुंड यांच्या नांवावर करणे आवश्यक होते. परंतु कै. काशीनाथ गुंड यांचे निधन झाल्याचे आढळून आल्याने तसेच त्यांच्या प्रथम वारसदार म्हणून श्रीमती विठाबाई का. गुंड यांच्याकडून नवीन नांव बदली अर्ज प्राप्त झाल्याने सदर देयक त्यांच्या नांवावर दि. १७.०६.२००८ पासून करण्यात आला.

विद्युत कायदा - २००३ कलम २(१५) अन्वये वीजग्राहक म्हणजे एखादी व्यक्ती स्वत:च्या वापरासाठी अधिकृत विद्युत पुरवठा करणाऱ्या संस्थेकडून किंवा सरकार किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून विद्युत पुरवठा घेते

वरील विद्युत कायाद्याच्या व्याख्येनुसार जी व्यक्ती वीजेचा वापर करते अशी व्यक्ती वीजग्राहक समजली जाते व एखादा विद्युत अपघात घडून आल्यास जी व्यक्ती वीजेचा वापर करते, ती व्यक्ती अशा अपघातास जबाबदार असते. श्री. विश्वनाथ का. गुंड हे बेस्ट उपक्रमाद्वारे पुरवठा केला जाणाऱ्या वीजेचा वापर करत आहेत.

**मंचाकडून अपेक्षित मदतीचे स्वरूप** :

श्री. विश्वनाथ का. गुंड यांनी दि. २६.०८.२००८ च्या पत्रासोबत स्वत:च्या व त्यांचा भाऊ चंद्रकांत का. गुंड यांच्या नांवावर असलेली माहे मे २००८ ची भाडेपावती व शिधावाटप पत्र जोडलेले होते (ज्या मध्ये श्रीमती विठाबाई का. गुंड व श्री. अनिल का. गुंड यांची नांवे दि. २७.०४.२००४ रोजी रद्द केलेली होती.) बेस्ट उपक्रमाच्या वतीने आम्ही असे नमुद करू इच्छितो की, सदर जागेची भाडेपावती ही श्री. विश्वनाथ का. गुंड व श्री. चंद्रकांत का. गुंड या दोघांच्या नांवे होती. नांवात बदल करण्याच्या नियमानुसार श्री. विश्वनाथ का. गुंड यांनी इतर वारसदारांचे संमतीपत्र देणे आवश्यक होते. सदर संमतीपत्र त्यांनी सादर केल्यास ५१५-०८०-००९ या क्रमाकांचे वीजदेयक त्यांच्या नांवे करता येईल. अंतरिम अवधीमध्ये सदर वीजदेयक मूळ वीजग्राहक श्री. काशिनाथ गुंड यांचे हे निधन पावल्याने त्यांच्या प्रथम वारसदार, त्यांच्या पत्नी श्रीमती विठाबाई का गुंड यांच्या नांवे करण्यात आले आहे.

अशाप्रकारे श्री. विश्वनाथ का. गुंड यांच्याकडून नांव बदली अर्जासोबत कै. काशीनाथ गुंड यांच्या पत्नी यांच्या श्रीमती विठाबाई का, गुंड या पहिल्या कायदेशीर वारसदार व मुलगा आणि वारसदार श्री चंद्रकांत का. गुंड या दोघांचे वीजदेयक श्री विश्वनाथ का. गुंड यांच्या नांवावर करण्यासाठी संमतीपत्र देणे आवश्यक आहे.

सुनावणीच्या वेळी बेस्टने श्री.विश्वताथ गुंड यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की बेस्टच्या विद्युत पुरवठ्याच्या अटी व शर्ती महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने मान्य केलेल्या १.५ व्याख्येनुसार व विद्युत कायदा - २००३ कलम २(१५) अन्वये वीजग्राहक म्हणजे एखादी व्यक्ती स्वत:च्या वापरासाठी अधिकृत विद्युत पुरवठा करणाऱ्या संस्थेकडून किंवा सरकार किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून विद्युत पुरवठा घेते

वरील विद्युत कायाद्याच्या व्याख्येनुसार जी व्यक्ती वीजेचा वापर करते अशी व्यक्ती वीजग्राहक समजली जाते व एखादा विद्युत अपघात घडून आल्यास जी व्यक्ती वीजेचा वापर करते, ती व्यक्ती अशा अपघातास जबाबदार असते. श्री. विश्वनाथ का. गुंड हे बेस्ट उपक्रमाद्वारे पुरवठा केला जाणाऱ्या वीजेचा वापर करत आहेत.

**निरीक्षण:**

१. वीजदेयक क्र. ५१५-०८०-००९ हे श्री. काशीनाथ एम्.गुंड यांच्या नांवे होते. श्री. काशीनाथ एम्. गुंड यांचे निधन दि. २५.०७.१९७२ रोजी झाले. तेव्हापासून १६.१२.२००३ पर्यंत वीजमापक वडिलांच्याच नावावर होते. तद्नंतर त्यांचा मुलगा श्री विश्वनाथ काशीनाथ गुंड याने दि. १६.१२.२००३ रोजी सदर वीजदेयक स्वत:च्या नांवे करण्यासाठी अर्ज केला होता. सदर अर्जात वडिलांच्या मृत्युनंतर त्यांची आई श्रीमती विठाबाई का.गुंड ही त्यांच्या सोबत रहात होती असे नमूद केले होते

२. नांवात बदल करण्याच्या नियमानुसार श्री. विश्वनाथ का. गुंड यांनी इतर वारसदाराचे संमतीपत्र देणे आवश्यक होते. तसे त्यांनी ते सादर केले नाही.

३. अंतरिम अवधीमध्ये सदर वीजदेयक मूळ वीजग्राहक श्री. काशिनाथ गुंड यांचे हे निधन पावल्याने त्यांच्या प्रथम वारसदार, त्यांच्या पत्नी श्रीमती विठाबाई का गुंड यांच्या नांवे करण्यात आले आहे.

४. सादर केलेल्या निवेदनातून मंचाचे सकृत्दर्शनी असे मत झाले की, सदर गाऱ्हाणे हे एक शुल्लक, पुरेसे कारण नसलेले व गाऱ्हकाला सकृत्दर्शनी कोणतीही हानी किंवा नुकसान किंवा गैरसोय झाली नसलेले आहे.

**आदेश**

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्रा.गा.नि.मं. आणि ओम्बडमन) विनियम, २००६ अन्वये विनियम ६.९ नुसार मंच ग्राऱ्हाणे नाकारत आहे. त्यामुळे सदर गाऱ्हाणे मंचाने दाखल करून घेतले नाही.

२. सदर गाऱ्हाण्याचे प्रकरण निकालात काढण्यात येत आहे.

३. दोन्ही पक्षकारांना आदेशाच्या प्रती दयाव्यात.

(श्री. सु.प्या.गोस्वमी)
हंगामी अध्यक्ष

(श्रीमती वनमाला मंजुरे)
सदस्या